# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/11/2023 (बुधवार) दुपार

---

## सोन्याचे दागिने चोरी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत एमआयडीसी बोरी चौक येथे दिनांक ०७/११/२०२३ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. खुशबु रवि केवटे, वय ३० वर्ष रा. स्वर्ग विहार अपार्टमेन्ट आनंदधाम रेसीडेन्सी बोटाद जिल्हा बोटाद गुजरात हे आपले पती सोबत नागपुर वरून बुट्टीबोरी येत असतांना एमआयडीसी बोरी चौक येथे बस मधुन खाली उतरली असता थोडया अंतरावर गेल्यावर फिर्यादीच्या हॅन्ड बॅगची चैन उघडी दिसल्याने हॅन्ड बॅग मध्ये बघीतले असता १) २ नग सोन्याच्या अंगठया वजन प्रत्येकी ०५ ग्रॅम किंमती ३००००/– रू २) सोन्याचे कानातले रींग वजन ०५ ग्रॅम कींमती १५०००/– रू. ३) एक सोन्याचे लॉकेट वजन ०१ ग्रॅम कींमती ३०००/– रू असा एकुण ४८०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार कावळे मो. नं. ९९२३३१९६५४ हे करीत आहे.

## ऑईल चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत ३० किमी अंतरावर मौजा पाचगाव येथे दिनांक १४/०८/२०२३ चे १४.३० वा. ते दिनांक २०/०८/२०२३ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– केतन अशोक टापर, वय ५१ वर्ष रा. चंद्रदिप अपार्टमेट निकालस मंदीर फवारा चौक, इतवारी नागपुर हा आनंद मोहता ॲगो इंडस्टी प्रा. लि. कंपनी डायरेक्टर म्हणुन काम पाहतो याच्याकडे ऑईल तयार होते ते संपुर्ण भारतात जात असते. सदर रींफायरीचा माल कलकत्ता येथे पाठविण्याकरीता ट्रान्सपोर्टची गरज असल्याने यातील आरोपी क्र. ०१) हर्षीत गुप्ता याने ट्रान्सपोर्टची गाडी उपलब्ध करून दिली व सदर ट्रान्सपोर्टचा टॅकरमध्ये ३०,०५०/–रू. किलो ऑईल कींमती ३२,८१,४६०/–रू. टॅन्कर हा दिनांक १४/०८/२०२३ ला कलकत्ता नागपुर मार्ग निघाला होता. काही दिवासांनी फिर्यादीला फोन आला सदर टॅन्कर हा कलकत्ता पोहचला नाही सदर टॅन्कर हा देवगड (ओडीसा) येथे पडलेला स्थितीत होता. सदर घटनास्थळी दि. २१/०८/२०२३ रोजी पडलेला टॅकर केनने उचलला तर तेथे ऑईल नव्हता यावरून खात्री पटली की यातील आरोपीतांनी संगमनत करून फौजदारी कट करून ऑईलची अपहरण करून चोरीने आईलची विक्री केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे **आरोपी नामे– १) हर्षीत गुप्ता, रा. इंदोर २) महेंद्रकुमार हरगोविंदभाई ठाकरे, रा. रविनगर कमलापुर ता. राधनपुर जि. पटान गुजरात ३) सवारपु कल्याण ताताराव रा. गोकुलधाम डी. पी कच्ध गुजरात ४) संजय हजारीलाल मवार रा. मच्धुनगर खरी रोहर गुजरात** यांचे विरूद्ध कलम १२० ब, ३७९, ४०७, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. हरीहर सोनकुसरे, मो. नं. ९०२१५४२९१८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर